


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

संस्थापक—प्रो. वा. गो. काळे ★ संपादक—श्री. वा. काळे

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख १० जुलै १९४६ अंक २८

## —: साठे बिस्किटें :—

श्रूसबरी, ऑरेंज, फ्रॅन्सिस व फॅमिली मुंबई प्रांतांतील ग्राहकांस पूर्ववत् मिळूं लागलीं. परिस्थिति अनुकूल होतांच इतर प्रांतांतील ग्राहकांसहि पाठवूं शकूं.

—साठे बिस्किट कं., पुणें २

---

सर्व प्रांतांतील सुती, गरम व रेशमी खादीचा सुंदर संच

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

---

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लिमिटेड.

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, पुणें.

मुंबई शाखा : इस्माईल बिल्डिंग, फोर्ट, मुंबई.

अधिकृत व विक्रीस

| | |
|---|---|
| काढलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | „ १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | „ ४,६१,३०० |
| एकूण खेळतें भांडवल | „ ५०,००,००० |

मद्रास, सोलापूर, नगर व मुंबईवर ड्राफ्टस् दिले जातात.

शेअर सर्टिफिकेटस् तयार आहेत. तरी शेअरबाबतच्या पावत्या पाठवून दिल्याबरोबर सर्टिफिकेटस् पाठविण्याची व्यवस्था होईल.

गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलूएल. बी., मॅनेजर

चिं. त्रिंबक चितळे, मॅ. डायरेक्टर

---

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

—:शाखा:—

(१) पुणें कॅन्टोनमेंट (२) बारामती (३) लोणावळा (४) बेलापूर. पे-ऑफिसः-खोपोली (जि. कुलाबा)

एकूण खेळतें भांडवल : ३५,००,००० रु. वर

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B.

पुढील गांवांवर डिमांड ड्राफ्टस दिले जातातः— नगर, मुंबई, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे

आमचे बारामती शाखेंत वेस्टर्न इंडिया, वॉर्डन, एशिअन, वगैरे कंपन्यांचे हप्ते स्वीकारण्याची व्यवस्था केली आहे.

शेअर विक्री चालू आहे.

गत वर्षी कर माफ ४% डिव्हिडंड देण्यांत आलें.

—सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात—

रा. बा. साळवेकर, नी. ना. क्षीरसागर. मॅनेजिंग डायरेक्टर्स.

## विविध माहिती

**३% डिफेन्स कर्जरोखे**—३% डिफेन्स बॉंडसची परतफेड १ ऑगस्ट १९४६ रोजीं केली जाईल. त्या दिवसानंतर बॉंडसच्या रकमेवर व्याज मिळणार नाहीं.

**अन्नाचा नाश थांबविण्याचे चार मार्ग**—अन्नाचा नाश थांबविण्याचे चार मार्ग हिंदुस्थान सरकारचे असि. डायरेक्टर ऑफ रेशनिंग श्री. शेठ, ह्यांनीं आपल्या १ जुलैच्या रेडिओवरील भाषणांत सांगितले: (१) तुमच्या वाट्याचें सर्व रेशन विकत घेण्याचें कारण नाहीं, (२) खातां येईल त्यापेक्षां अधिक शिजवूं नका, (३) पाहुणे बोलावूं नका आणि (४) धान्याऐवजीं इतर अन्न उ. भाज्या, फळें, मासे, मांस वा. श्रीमंत लोकांनाच ह्या उपदेश लागू आहे, हें उघड आहे.

**सायकलीचा मूळ संशोधक**—सुमारें १०० वर्षांपूर्वी करपॅट्रिक मॅकमिलन ह्यानें जगांतील पहिली सायकल तयार केली. त्या लोहारानें जेथें भट्टी घातली, तेथील भिंतीवर एक स्मारकचिन्ह घालण्याचा समारंभ नुकताच पार पडला. मॅकमिलन १८७८ सालीं मरण पावला. त्याला त्याच्या शोधापासून एका पैचीहि प्राप्ती झाली नाहीं.

**युद्धकालीन संशोधकांस बिदागी**—युद्धकाळांत ब्रिटिश सरकारनें किंवा मित्र राष्ट्रांच्या सरकारांनीं जे शोध उपयोगांत आणले, त्यांच्या संशोधकांस बक्षिसें सुचविण्यासाठी एका बादशाही कमिशनची नेमणूक करण्यांत आली आहे. एकाच शोधास अनेक संशोधकांचा हातभार लागलेला असतो अशा प्रसंगीं प्रत्येकाचा त्यांतील वाटा निश्चित करणें अवघड असतें. पहिल्या महायुद्धाचे असेंर असेंच कमिशन नेमण्यांत आलें होतें, त्याचें काम १९३७ सालीं पुरें झालें, एवढ्यावरून त्या कामाचा बिकटपणा लक्ष्यांत येईल.

**फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याची घोषणा**—फिलिपाइन्स बेटांचें स्वातंत्र्य प्रेसिडेंट ट्रुमन ह्यांनीं जाहीर केलें आहे. १८९८ सालापासून हीं बेटें अमेरिकेच्या सत्तेखालीं होतीं. स्पॅनिश-अमेरिकन युद्धानंतरच्या पॅरिसच्या तहान्वयें अमेरिकेस तीं स्पेनकडून मिळालीं. १९३४ च्या टायडिंग्ज-मॅकडफी ॲक्टानें फिलिपाइन्स स्वतंत्र होण्याची व्यवस्था केली. अमेरिकन वसाहती इंग्लंडपासून स्वतंत्र झाल्या, त्यास १७० वर्षे ज्या दिवशीं पुरीं झालीं त्याच दिवशीं फिलिपाइन्सच्या स्वातंत्र्याची घोषणा अमेरिकेनें आतां केली आहे. फिलिपाइन्सची लोकसंख्या १ कोटी ८० लक्ष आहे. अमेरिका आणि फिलिपाइन्स ह्यांचेमध्यें ह्यापुढें आठ वर्षे खुला व्यापार चालावा व त्यानंतर २० वर्षे दोन्ही देशांच्या निर्गतीवरील जकात कमी होत जावी, अशी फिलिपाइन ट्रेड ॲक्टानें व्यवस्था केली आहे.

**खेडगांवांच्या स्वच्छतेस प्रोत्साहन**—मिस फ्लॉरेन्स नाइटिंगेल व्हिलेज सॅनिटेशन फंडांतून दरसाल प्रत्येकीं १५० रुपयांच्या देणग्या खेडेगांवांत स्वच्छता राखण्यासाठी देण्यांत येतात. खेडेगांवांच्या स्वच्छतेंत सुधारणा करण्यांत गुंतलेल्या संस्थांना आर्थिक सहाय्य हवें असल्यास यांनीं आपल्या कामाचा अहवाल सोशल सर्व्हिस लीग, मुंबई ४, ह्या पत्त्यावर पाठवावा.

**नियोजन खात्याची इतिश्री**—हिंदुस्थान सरकारचें नियोजन खातें गव्हर्नर जनरलनीं ४ जुलैपासून रद्द केलें आहे. त्या खात्याचें काम इतर खात्यांत वाटून देण्यांत आलें आहे.

**दंडाची रकम वाढून पुनः वरती सक्तमजुरी**—"गुन्हा करणें किफायतशीर बनेल, इतकी अल्प शिक्षा गुन्हेगारास देऊन गुन्ह्यास उत्तेजन मिळेल असें होऊं न देणें हें ह्या कोर्टाचें कर्तव्य आहे" असें म्हणून मुंबई हायकोर्टानें रेशनिंग ऑर्डर मोडणाऱ्या पुण्याच्या एका व्यापाऱ्याची शिक्षा वाढविली. त्यानें काळ्या बाजारांत विकण्यासाठीं आपल्या दुकानांतून ११ शेर साखर बाहेर धाडली, ह्यासाठी मॅजिस्ट्रेटनें त्यास १५० रुपये दंड केला. त्यावर सेशन्स जज्जाकडे त्यानें अपील केलें तें नामंजूर झाल्यावर त्यास हायकोर्टाकडे रिव्हिजन अर्ज करण्याची बुद्धि सुचली, त्याचा परिणाम १५० रुपयांचा दंड १,००० रुपये होण्यांत व ३ महिन्यांची सक्तमजुरी मिळण्यांत झाला.

**दुष्काळाची भीति नाहीं**—नोव्हेंबर-डिसेंबरपर्यंत पुरेल इतक्या धान्याची व्यवस्था सरकारनें केली आहे, असें मुंबई प्रांताचे पंतप्रधान श्री. खेर ह्यांनीं सांगितलें.

**अमेरिकेचें औदार्य**—लेंड-उसनवार पद्धतीनें अमेरिकेनें हिंदुस्थान, ऑस्ट्रेलिया, ग्रेट ब्रिटन, फ्रान्स, तुर्कस्तान, बेल्जम, इत्यादींस ३३०० कोटि डॉलर्सचा माल पुरवला आणि त्या देशांकडून अमेरिकेस ७० कोटि डॉलर्सचा माल मिळाला. सुमारें २५०० कोटि डॉलर्सचें अमेरिकेचें येणें निघतें तें अमेरिकेनें सोडून दिलें आहे.

**सं. प्रांतांतील आय. सी. एस. ची नवी भरती**—संयुक्त प्रांतांतील आय. सी. एस. च्या जागांवर नेमण्यांत यावयाचे युद्धकामगिरीचे इंग्रज पत्करण्यास त्या प्रांताचें सरकार तयार नाहीं. सल्लागारांच्या सहायानें चालणाऱ्या कारभाराचे वेळीं प्रांतिक सरकारनें आय. सी. एस. व आय. पी. एस. च्या जागा वाढविल्या, त्या नव्या मंत्रिमंडळास मान्य नाहींत. संयुक्त प्रांत सरकारनें आपला विरोध मध्यवर्ती सरकारास कळविला आहे.

**मनीऑर्डरी स्वीकारणें बंद**—ता. ८ जुलैपासून पोस्ट ऑफिसांत रजिस्टर्ड व इन्शुअर्ड जिन्नस, व्ही. प्या. आणि मनिऑर्डरी स्वीकारलीं जाणार नाहींत. सरकारतर्फे पाठविण्यांत येणारीं रजिस्टरें आणि औषधांचीं पार्सलें मात्र घेतलीं जातील. पोस्टांतील नोकरांच्या संपामुळें हें आवश्यक झालें आहे.

**नेदरलँडस बँकेचें राष्ट्रीयकरण**—नेदरलँडस बँकेचें राष्ट्रीयकरण करण्याचा आपला बेत तेथील नव्या मुख्य प्रधानानें जाहीर केला आहे. महत्त्वाच्या उद्योगधंद्यांची मालकी सरकारकडे घेण्याचीहि त्यांची तयारी आहे.

**बँक ऑफ इंडियामधील संप**—मुंबई येथील बँक ऑफ इंडियाच्या नोकरांचा संप १२ दिवस चालल्यावर तो सोमवार ता. ८ रोजीं बंद झाला व नोकर पुनः कामावर गेले. नोकर वर्गाचे प्रतिनिधी व बँकेचे डायरेक्टर ह्यांचेमध्यें तडजोड झाली आहे. संपाच्या मुदतीचा पगार नोकरांस मिळणार आहे.

**इंटर नॅशनल बँकेची वर्गणी**—इंटर नॅशनल बँकेच्या वर्गणीची रकम हिंदुस्थानानें अद्याप द्यावयाची आहे. एकूण देणें वर्गणी १३२ कोटि रुपये आहे, त्याच्या २% इतकी रकम बँकेच्या कार्यास प्रारंभ झाल्यापासून दोन महिन्यांचे आंत भरली पाहिजे. २५ जून रोजीं बँकेस अधिकृतरीत्या प्रारंभ झाला; तेव्हां २५ ऑगस्टपूर्वी हिंदुस्थानानें २ कोटि ६४ लक्ष रुपये भरले पाहिजेत. ह्या प्रश्नांचा विचार मध्यवर्ती असेंब्लीची स्टॅन्डिंग कमिटी लवकरच करणार आहे.


**डुप्लीकेटर्स** घरगुती छपाईचें उत्कृष्ट यंत्र !

फक्त एका वर्षाच्या प्रिंटिंगच्या खर्चांत विकत मिळणारें, साधें व सुटसुटीत, हरकामी, लहान-मोठे व्यापारी, कारखानदार, शिक्षण व इतर संस्था, क्लब्ज वगैरेंना नेहमीं लागणारें प्रिंटिंगचें काम या यंत्रावर सुबक रीतीनें मिळतें. कॅश-मेमोज, बिल फॉर्मस, सर्क्युलर्स, दर पत्रकें, हँडबिल्स, परीक्षेचे पेपर्स वगैरे सर्व प्रकारचीं व सर्व भाषेंतील प्रिंटिंगचीं कामें या यंत्रावर होतात.

अधिक माहिती व किंमतीबद्दल आजच लिहा.

कारखानदार:—

**शेवडेज कॅमेरा वर्क्स लि.**

टिळकवाडी, बेळगांव

# घटना समितीची निवडणूक

हिंदुस्थानची भावी घटना कोणत्या प्रमुख मुद्यांवर आधारण्यांत यावी हें ब्रिटिश मंत्रिशिष्टांनीं ता. १५ मे रोजीं जाहीर केलें. कॉंग्रेस व मुस्लिम लीग ह्यांचेमध्यें ऐकमत्य न झाल्याकारणानें, मंत्रिशिष्टांना स्वतःची योजना आखावी लागली. ह्या योजनेंत कित्येक दोष असूनहि पाया ह्या दृष्टीनें कॉंग्रेसनें ती मान्य केली व मुस्लिम लीगनेंहि तिला मान्यता दिली. हंगामी सरकारच्या योजनेस कॉंग्रेसनें विरोध केला तरी मुस्लिम लीगनें संमति दर्शविली. तथापि, इतक्यांत हें हंगामी सरकार स्थापन होण्याची शक्यता नाहीं. सर्वांची नजर घटना समितीच्या निवडणुकीकडे आतां लागून राहिली आहे. जुलैअखेर निवडणुकी संपतील व त्यानंतर घटना समितीची बैठक भरेल. त्या बैठकीच्या पूर्वतयारीस व्हाइसरॉयांनीं प्रारंभहि केला आहे. वेगवेगळ्या पक्षांच्या उमेदवारांचीं नांवें सुचविण्यांत येत आहेत आणि ही समिती शक्य तेवढी भारदस्त, प्रातिनिधिक व तज्ज्ञ लोकांची करण्याचा कॉंग्रेस पक्षाचा विचार आहे.

घटना समितीवर सर्व लोकांस योग्य प्रतिनिधित्व मिळावें ह्या दृष्टीनें वयांत आलेल्या सर्व नागरिकांनीं मतें नोंदवून निवडून आलेल्यास समितीचें सभासदत्व देणें योग्य ठरलें असतें. परंतु, सध्यांच्या परिस्थितींत अशी निवडणूक अव्यवहार्य आहे, असें मंत्रिशिष्टांनीं ठरविलें व नुकत्याच निवडून आलेल्या प्रांतिक लेजिस्लेटिव्ह असेंब्लीची निवडणूक मंडळें म्हणून उपयोग करून घेणें सोईचें दिसलें. परंतु त्यांत दोन अडचणी आढळल्या. प्रांतांच्या असेंब्लींतील सभासदांची संख्या ठरवितांना, इतक्या लोकसंख्येस इतके प्रतिनिधी, असें प्रमाण घातलेलें नसल्याकारणानें आसामची लोकसंख्या १ कोटि असून त्याच्या असेंब्लींत १०८ सभासद ठेवले आहेत, तर बंगालची लोकसंख्या आसामच्या सहापट असूनहि त्याच्या असेंब्लींत २५० च सभासद आहेत. दुसरी अडचण अशी कीं, अल्पसंख्याकांना त्यांच्या संख्येच्या मानानें प्रांतिक असेंब्लींतून जास्त जागा देण्यांत आलेल्या आहेत.

वरील अडचणींतून मार्ग काढण्यासाठी घटना समितीच्या निवडणुकीकरितां खालील तत्त्वांचा अवलंब करण्यांत आला आहे:—(१) वयांत आलेल्या प्रत्येकास मत देतां आलें नाहीं, तरी लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधी निवडले जावे ह्यासाठी १० लक्ष लोकसंख्येस एक प्रतिनिधी दिला आहे. प्रत्येक प्रांताच्या वाट्यास ह्याप्रमाणांत प्रतिनिधी येतील. (२) प्रत्येक प्रांताच्या वाट्यास आलेल्या प्रतिनिधींची वाटणी मुसलमान, शीख व इतर अशी केली आहे. अर्थात्, त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणातच ती करण्यांत आली आहे. (३) प्रत्येक प्रांतांतील लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या मुसलमान सभासदांनीं मुसलमान, शीख सभासदांनीं शीख व उरलेल्या सभासदांनीं इतर उमेदवारांची घटना समितीसाठीं निवड करावयाची आहे. लहान जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षां जास्त प्रतिनिधित्व प्रांतिक विधिमंडळांतून दिलें असलें, तरी लोकसंख्येच्या प्रमाणांत त्यांस घटना समितींत योग्य स्थान मिळणार नाहीं हें जाणून मंत्रिशिष्टांनीं आपल्या योजनेंत त्यांच्या हितरक्षणाची तजवीज केली आहे. नागरिकांचे हक्क, अल्पसंख्याक, वन्य जाती, इत्यादींसंबंधींचे प्रश्नासाठीं सल्लागार समिती नेमण्यांत येईल त्यांत त्यांस प्रतिनिधित्व दिलें जाणार आहे.

हिंदुस्थानांतील मूठभर युरोपियनांना कांहीं प्रांतांच्या विधिमंडळांतून भरमसाट प्रतिनिधित्व देण्यांत आलेलें आहे. विशेषतः बंगालसारख्या प्रांतांत ते आपल्या विशिष्ट स्थानाचा दुरुपयोग करूं शकतात. १० लक्ष लोकवस्तीस एक प्रतिनिधि, हें तत्त्व मान्य केल्यानंतर युरोपियनांच्या वाट्यास घटना समितींत जागाच येऊं शकत नाहीं. युरोपियन लोक हे विदेशीय आहेत, ते हिंदी नाहींत, ह्या मुद्यावर त्यांना घटना समितीच्या निवडणुकींत मतें देतां येणार नाहींत व त्यांस निवडणुकीसाठी उमेदहि राहतां येणार नाहीं, असें श्री. मुनशी, सर बक्षी टेकचंद वगैरे निष्णात कायदेपंडितांनीं आपलें तज्ज्ञ मत व्यक्त केलें आहे. महात्मा गांधींनीं ह्या प्रश्नाकडे विशेष लक्ष पुरवून, युरोपियनांस निवडणुकीपासून दूर राखण्याचा प्रयत्न केला आणि युरोपियनांनींहि हिंदी लोकमताची तीव्रता वेळींच ओळखली आहे असें दिसतें.

घटना समितीच्या एकूण ३८५ सभासदांपैकीं २९२ सभासद ब्रिटिश हिंदुस्थानांतून निवडून येतील व जास्तींत जास्त ९३ सभासद हिंदी संस्थानांचे रहातील. संस्थानांच्या प्रतिनिधींची निवड कशी करावयाची, हें अद्याप ठरलेलें नाहीं; संस्थानिकांशीं वाटाघाटी करून हें ठरविण्यांत येणार आहे. तथापि, आपल्या प्रजेस प्रतिनिधींची निवड करण्याची सवड देण्यांत येईल असें कांहीं संस्थानिकांनीं जाहीर केलें आहे. संस्थानांचे खरेखुरे प्रतिनिधी त्यांचे राजेरजवाडे होऊं शकत नाहींत, हें उघड आहे. आजच्या घटनेप्रमाणें मात्र त्यांचेमध्येंच सर्व हक्क एकत्रित झालेले आहेत. घटना समिती आपल्या प्रास्ताविक सभेंत कामकाजाचा अनुक्रम ठरवून अध्यक्ष वगैरेंची निवडणूक करील. वर सांगितलेली सल्लागार समितीहि निवडील. त्यानंतर प्रांतांच्या प्रतिनिधींचे अ, ब आणि क असे गट स्वतंत्रपणें बसून त्या त्या गटांतील प्रांतांच्या घटनेचा विचार करतील. गटाची स्वतंत्र घटना करावी किंवा नाहीं हें ते ठरवतील आणि गटानें कोणते प्रांतिक विषय आपल्या हातीं घ्यावेत हें निश्चित करतील. त्यानंतर, गटांचे व संस्थानांचे प्रतिनिधी एकत्र येऊन त्यांचेमध्यें मध्यवर्ती सरकारच्या घटनेची वाटाघाट होईल. अ ह्या गटांत मद्रास, मुंबई, संयुक्त प्रांत, बिहार, मध्यप्रांत, असून ब ह्या गटांत सरहद्द प्रांत, पंजाब आणि सिंध हे आहेत. क गटांत बंगाल व आसाम ह्यांचा समावेश होतो.

प्रत्येक प्रांतांतून निवडून यावयाच्या सभासदांचा तक्ता खालीं दिला आहे.

गट "अ"

| प्रांत | मुसलमानेतर | मुसलमान | एकूण |
|---|---|---|---|
| मद्रास | ४५ | ४ | ४९ |
| मुंबई | १९ | २ | २१ |
| सं. प्रांत | ४७ | ८ | ५५ |
| बिहार | ३१ | ५ | ३६ |
| मध्यप्रांत | १६ | १ | १७ |
| ओरिसा | ९ | ० | ९ |
| एकूण | १६७ | २० | १८७ |

गट "ब"

| प्रांत | इतर | मुसलमान | शीख | एकूण |
|---|---|---|---|---|
| पंजाब | ८ | १६ | ४ | २८ |
| सरहद्द प्रांत | ० | ३ | ० | ३ |
| सिंध | १ | ३ | ० | ४ |
| एकूण | ९ | २२ | ४ | ३५ |

गट "क"

| प्रांत | मुसलमानेतर | मुसलमान | एकूण |
|---|---|---|---|
| बंगाल | २७ | ३३ | ६० |
| आसाम | ७ | ३ | १० |
| एकूण | ३४ | ३६ | ७० |

| | |
|---|---|
| ब्रि. हिंदुस्थान | २९२ |
| हिं. संस्थानें | ९३ |
| एकूण | ३८५ |

**चीनला परदेशी भांडवल पाहिजे**—चीनमध्यें परदेशीयांची पैशाची गुंतवणूक आकर्षण्याच्या दृष्टीनें चीनचे प्रयत्न चालू आहेत.

**कूपर कंपनीमधील औद्योगिक वांधा**—कूपर इंजिनिअरिंग कं. लि. व तिचे कामगार ह्यांचेमधील औद्योगिक वांध्याचा निवाडा करण्याचें काम मुंबई सरकारनें दि. ब. कामेरकर ( सेवानिवृत्त डि. व सेशन्स जज्ज ) ह्यांचेकडे सोपविलें आहे.

## गोखले इन्स्टिटयूटचें संशोधन कार्य

ज्यांच्या देणगीमुळें गोखले इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकनॉमिक्सची स्थापना झाली, त्या कै.रा. ब.काळे ह्यांच्या स्मरणार्थं इन्स्टिट्यूटतर्फे दरसाल एका तज्ज्ञाचें अभ्यासपूर्ण व्याख्यान करवण्यांत येतें. गेल्या रविवारीं रिझर्व्ह बँकेचे आर्थिक सल्लागार श्री. जगन्नाथ विश्वनाथ जोशी, ओ. बी. ई. ह्यांचें " हिंदुस्थानचें इग्लंडमधील साठलेलें येणें " ह्या विषयावर इन्स्टिटयूटतर्फे 'काळे स्मारक ' व्याख्यान झालें. सभेचे प्रारंभीं इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर प्रो. धनंजयराव गाडगीळ ह्यांनीं गेल्या वर्षींच्या व्याख्यानानंतरच्या काळांत इन्स्टिटयूटनें केलेल्या कामाची थोडक्यांत माहिती सांगितली, ती अशीः- "इन्स्टिटयूटनें वाई तालुक्यांतील शेतीविषयक आर्थिक पहाणी पुरी केली. माहितीची पद्धतशीर मांडणी करण्याचें काम चालू आहे. प्राथमिक शिक्षणांतील अपव्ययाची चौकशी करण्याचें काम मुंबई सरकारनें इन्स्टिटयूटकडे सोपविलें त्याप्रमाणें सातारा जिल्ह्याच्या उत्तरेकडील तालुक्यांत हें काम चालू आहे. कोल्हापूर शहराच्या आर्थिक पहाणीचें काम त्या शहराच्या म्युनिसिपालिटीचे सांगण्यावरून इन्स्टिट्यूटनें पत्करलें आहे. माहिती गोळा करण्याचें प्राथमिक काम इन्स्टिटयूटच्या सर्वसाधारण देखरेखीखालीं चालू आहे. कोल्हापूर संस्थानाकरितां इंडेक्स नंबर तयार करून देण्याचें काम दरबारनें इन्स्टिटयूटला सांगितलें आहे. बरींच पुस्तकें लिहून तयार असलीं तरी छपाईच्या अडचणीमुळें तीं अद्याप प्रसिद्ध झालेलीं नाहींत, त्यांत डॉ. काकडे ह्यांच्या सोलापूरमधील विणकरांच्या आर्थिक पहाणीचा व प्रो. टी. एम. जोशी ह्यांच्या मुंबई सरकारच्या आर्थिक संसाराचा समावेश होतो. गेल्या वर्षीं सर दोराबजी टाटा ट्रस्टनें इन्स्टिटयूटला दरसाल १५ हजार रु. ह्याप्रमाणें पांच वर्षांत ७५ हजार रुपये शेतीविषयक आर्थिक संशोधनाची शाखा स्थापन करण्यासाठीं देऊं केले. ते इन्स्टिटयूटनें स्वीकारले असून महाराष्ट्रांतील दुष्काळी विभागाच्या पहाणीचें काम त्या शाखेमार्फत १९४७ सालीं सुरू होणार आहे."

## हिंदुस्थानचें इंग्लंडमध्यें सांचलेलें येणें

### उपकाराची फेड अपकारानें होणार काय?

" हिंदुस्थानचें इंग्लंडमध्यें युद्धजन्य स्टर्लिंग येणें साठलें आहे, तें कमी रकमेवर तोडण्यांत यावें असा ब्रिटिश प्रचार चालू आहे, त्यांत तथ्य नाहीं. तो मलतवी स्वरूपाचा आहे. हप्त्याहप्त्यांनीं कर्जफेड करण्यास इंग्लंड पूर्णपणें समर्थ आहे. युद्धखर्चाचा बोजा प्रत्येक राष्ट्राच्या शक्तीच्या प्रमाणांतच त्यावर बसविला पाहिजे. दर माणशीं उत्पन्न व युद्धकालांतील रहाणीचें मान ह्यांची तुलना करतां, अमेरिका व इंग्लंड ह्यांचे मानानें हिंदुस्थानानें फार मोठा त्याग केलेला आहे. हिंदुस्थानचें इंग्लंडनें यावयाचें देणें कमी करण्यांत यावें, ही अमेरिकेची सूचना अयोग्य आहे. इंग्लंडनें हिंदुस्थानचें सबंद देणें, देण्यास नकार दिला व एकट्याच्या मताप्रमाणें तें कमी केलें, तर त्याचा अर्थ ' हिंदुस्थानाच्या दरिद्री जनतेच्या कनिष्ट रहाणीच्या मानांत आणखी उतार होऊं न देण्यापेक्षां इंग्रजांच्या चैनींत किंवा स्वास्थ्यांत थोडी वाढ करणें हें इंग्रजांस अधिक उचित वाटतें ' असाच निष्कर्ष कोणाचेंही समतोल मन काढील हें उघड आहे. ' उदारपणानें दिलेलीं हीं कर्जें उपकारपूर्वक फेडलीं जातील,' हे लॉर्ड केन्स ह्यांचे उद्‌गार कर्जांची रक्कम कमी केल्यानें फोल ठरणार नाहींत काय?" रिझर्व्ह बँकेचे आर्थिक सल्लागार श्री. जे. व्ही. जोशी ह्यांचें भाषण.

**उद्‌घाटन समारंभ**—दि बँबे मॉडर्न प्रिंटिंग अँड डाइंग वर्क्सचा उद्‌घाटन समारंभ रविवार, ता. ७ जुलै रोजीं मराठा चेंबरचे कार्याध्यक्ष, श्री. दामुअण्णा पोतदार, ह्यांचे हस्तें झाला.

**शेठ डालमियांचे वाढते हितसंबंध**-शेठ रामकृष्ण डालमिया ह्यांनीं सुमारें १ कोटि रुपये पेरून व आठ मोठ्या हिंदी कंपन्यांचे बहुसंख्य भाग मिळवून त्यांवर आपली हुकमत प्रस्थापित केली आहे. इंडियन नॅशनल एअरवेज आणि ध्रांगध्रा केमिकल वर्क्स हीं शेटजींच्या पंखाखालीं आतां गेलीं आहेत.








पुणें चीफ एजंट्स:—
मेसर्स श्री दत्त एजन्सी
१००, रविवार पेठ, मोती चौक पुणें















## कॉमन्स–सभेंतील अन्न चर्चा

### स्वार्थत्यागाची झाकली मूठ

ता. २१ जुलै पासून ब्रिटनमध्यें पाव शिधापद्धतीप्रमाणें वाटण्यांत येणार असें वृत्त नुकतेंच आलें होतें. ब्रिटिश सरकारतर्फें पुरस्कार केलेल्या या योजनेवर हुजूरपक्षीयांनीं वादविवाद व्हावा अशी इच्छा प्रदर्शित केली होती. त्या इच्छेस अनुसरून ता. ३जुलै रोजीं या वादविवादास प्रारंभ होऊन पाव शिधापद्धतींत घालण्यांत यावा असें ठरलें. हुजूरपक्षानें अन्नखात्यानें केलेल्या पैशाच्या मागणींत ५ पौंडांची कपात सुचविली. पण ती १७८ अनुकूल व ३४३ मतें विरुद्ध पडून नामंजूर झाली. ब्रिटनचे नवे अन्नमंत्री मि. जॉन स्ट्रॅची यांनीं ब्रिटननें जगांतील अर्धपोटी रहाणाऱ्या राष्ट्रांसाठीं काय घस सोसली त्याविषयीं कांहीं आंकडे सांगितले. नोव्हेंबर १९४५ सालपासून ब्रिटननें हिंदुस्थानाला ६० हजार टन गहूं पाठविला, ६० हजार टन गहूं इटली, ग्रीस व युगोस्लाव्हिआ या राष्ट्रांना पुरविण्यांत आला, ६० हजार टन गहू जर्मनीला पाठविण्यांत आला आणि १० हजार बेल्जमला धाडण्यांत आला, अशी माहिती मि. स्ट्रॅची यांनीं सांगितली आणि इतका स्वार्थत्याग करणाऱ्या राष्ट्राचे आपण एक नागरिक आहों याबद्दल आपणांस अभिमान वाटतो, असे स्वयंतुष्ट वृत्तीचे उद्‌गार काढण्यासहि ते विसरले नाहींत. पार्लमेंटमधील वादविवाद काय तऱ्हेनें चालतात व चालवावेत तें मि. स्ट्रॅची यांना चांगलें अवगत आहे. पूर्वोक्त आंकड्यांचा भडिमार केल्यावर कोणीहि अनभिज्ञ माणसाला असें वाटेल कीं, काय हो खरोखर या ब्रिटनमधील मजूर सरकारला माणुसकीची कदर फार आहे. पण मि. स्ट्रॅची यांनीं ब्रिटिश सरकारच्या माणुसकीवरील विश्वास उडण्यासारखे आंकडे आपल्याच तोंडानें वादविवादाअखेर सांगितले. हुजूर पक्षाच्या विरोधी टीकाकारांचीं तोंडें बंद करता यावीं म्हणून मि. स्ट्रॅची यांनीं जे आकडे हातचे राखून ठेवले ते पुढील प्रमाणें आहेत. ब्रिटनमध्यें पावाची शिधापद्धत अमलांत नेणार असली तरी मांसाचें दरडोई प्रमाण वाढविण्यांत आलेलें आहे. त्यामुळें सर्वसाधारण ब्रिटिश नागरिकाला पूर्वी २८५० कॅलोरी उष्णता उत्पन्न करूं शकणारें अन्न रोज मिळत असे त्याऐवजीं आतां दरदिवशीं २८०० कॅलोरी उष्णता उत्पन्न करूं शकेल इतकेंच मिळणार आहे. म्हणजे ब्रिटनच्या नागरिकांचें फारच थोडें अन्न तुटणार आहे हें उघड आहे. उष्णतेच्या मापक कॅलोरीजच्या हिशोबानें इतर देशांना किती अन्न दरडोई मिळतें त्यासंबंधीं मि. स्ट्रॅची यांनीं पुढील प्रमाणें आंकडे दिले. फ्रान्स, बेल्जम, हॉलंड व नॉर्वे २३०० ते २५०० कॅलोरी, ग्रीस, युगोस्लाव्हिआ, झेकोस्लोव्हाकिआ व इटली १८०० ते २५०० कॅलोरी. हा हिशेब खरा आहे असें धरून चाललें तर ब्रिटनमधील अन्नाची परिस्थिति पूर्णपणें समाधानकारक आहे असेंच म्हणावें लागेल.

मि. स्ट्रॅची यांनीं हुजूरपक्षाच्या टीकाकारांना उत्तर म्हणून जे आकडे राखून ठेवले होते ते मागाहून जाहीर करून ब्रिटनच्या स्वार्थत्यागाची झाकली मूठ उघडी केली हें फार चांगलें झालें. कारण त्यामुळें दिवसांतून पांच–पांचदा यथेच्छ जेवणाऱ्या ब्रिटिश जनतेच्या स्वार्थत्यागाचें खरें स्वरूप उघडें तरी झालें. युद्धापूर्वीपेक्षा ब्रिटिश नागरिकांना युद्धकालींच अधिक सकस व भरपूर अन्न मिळत होतें ही वस्तुस्थिति खुद्द ब्रिटनमधील तज्ज्ञच मान्य करतात. पण आंकडेवारीनें दाखविण्यांत येणारा हा स्वार्थत्यागहि खरा नाहीं, कारण ब्रिटननें जगांतील उपोशित राष्ट्रांना जें धान्य पाठविलें आहे तें अमेरिकेकडून ब्रिटनला परत मिळावयाचें आहे. या परत मिळणाऱ्या अन्नधान्याखेरीज ब्रिटननें १ लाख ९२ हजार टन गहूं, १ लाख ९० हजार टन आटा, १ लाख ५ हजार टन बार्ली, व १३ हजार ५०० टन बटाटे येवढी सामुग्री जर्मनींतील ब्रिटिश-शासित भागांत धाडली आहे. जर्मनीला धाडलेली ही सामग्री अमेरिकेकडून परत मिळणार कीं नाहीं याचा खुलासा मि. स्ट्रॅची यांनीं केलेला नाहीं. ती परत मिळणार नाहीं असें धरलें तरी सुद्धां ब्रिटनच्या अन्नाच्या दरडोई शिध्यांत फारशी कपात झाली आहे असें म्हणता येत नाहीं. ब्रिटनमधील शिधापद्धति मुळांतच सदोष आहे. नागरिकांचें वय, ते करीत असलेल्या कामाचें महत्त्व, ऋतुमान, स्त्री-पुरुषभेद इत्यादि बारिकसारीक बाबी लक्षांत घेऊन शिधापद्धति आखली तर ती अधिक गुंतागुंतीची झाली तरी अधिक कार्यक्षमहि होईल. आणि त्यामुळें ब्रिटनला बाहेरच्या अर्धपोटी जगाच्या पोटांत दोन घास अधिक टाकता येतील. मजूर सरकारनें मनावर घेतलें तर त्यांना नवी शिधापद्धति सहज अमलांत आणता येईल.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

सन १९४५ मधील प्रगति
नवें काम ७,००,००० रु.
चालू काम २०,००,००० रु.
१९४५ मधील हप्त्यांचें उत्पन्न
सुमारें १,००,००० रु.
खर्चाचें प्रमाण फक्त ११%
— आपला विमा किंवा एजन्सी आजच घ्या —
दि औंध म्यूच्युअल लाइफ ॲश्युरन्स सोसायटी लि., पुणें.
आर. जी. साठे
सुपरिंटेंडेंट
व्ही. जी. जोशी
मॅनेजिंग डायरेक्टर






# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )

व्याज-वजा

† सिंप्लेक्स रु. ९ दि. ४-७-४६

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २।७।४६ | बुधवार ३।७।४६ | गुरुवार ४।७।४६ | शुक्रवार ५।७।४६ | सोमवार ८।७।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | ३२१५—० | | | ३२७२—८ | |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ५६५—० | | | ५७६—० | |
| २२२२-८; १७६३-१२ | ५०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २६२०—० | | | २६८६—४ | |
| ७०२; ५६६ | १९—०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ९३९—० | | | ९५५—० | |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ८३४—० | | | ८५१—० | |
| ४४३-८; ३६० | ५-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपुर | १०० | ४६८—० | | | ४८४—० | |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ४६१—० | | | ४६१—० | |
| ३३५; २८३-८ | ८-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३९०—० | | | ३९०—० | |
| ३३७; २४३ | ९-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ४५४—० | —बाजार बंद— | —बाजार बंद— | ४५६—०† | —बाजार बंद— |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ५-७-० | | | ५-१२ | |
| १७-१०; १३-७-० | ०-१५-८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | २२-०-६ | | | २३-०-० | |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | ४-१०-६ | | | ५-०-० | |
| ७९०; ६४५ | ३५-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ९६२—८ | | | ९८६—४ | |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | २६१—८ | | | २५९—८ | |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | ३३२—० | | | ३३५—८ | |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ७८२—८ | | | ७९५—० | |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ५८-१२ | | | ५८-१२ | |
| | | | ३½% रोखे | १०० | १०५—३ | | | १०५—५ | |

## सोव्हिएट रशिआंतील पुनर्घटना

जर्मन आक्रमणामुळें झालेली अपरिमित हानि भरून काढण्याचें व नवीन औद्योगिक केंद्रें उभारण्याचें काम सोव्हिएट रशिआच्या चौथ्या पंचवार्षिक योजनेप्रमाणें हातीं घेण्यांत आलें असून तें झपाट्यानें प्रगत होत आहे. कॉकेशस पर्वताच्या उत्तरेला असलेल्या स्टाव्हरापोल या शहराजवळ एक प्रचंड धरण बांधण्यांत येत असून धरणापासून काढण्यांत येणाऱ्या कालव्याच्या पाण्यानें सामुदायिक शेती-संघांना २५ हजार एकर अगदी नवीन जमीन लागवडीखालीं आणतां येईल. ठिकठिकाणीं वीज उत्पन्न करण्याचीं शक्ति-केंद्रें उघडण्यांत येत असून खेरावेशन या नदीच्या खोऱ्यांत पाणी अडवून त्याचा साठा करण्याची योजना आखली गेली आहे. हें धरण सोव्हिएट रशिआंतील सर्वांत मोठें म्हणजे ६० कोटी क्यूबिक मीटर पाणी साठविणारें होईल. १९४० सालीं सोव्हिएट रशिआंत सामील झालेल्या लॅटव्हिया या प्रजासत्ताक राज्याची राजधानी रिगा येथें बंदर बांधण्याचें काम चालू झालें आहे. १९४७ सालीं दर्यावरील वहातुकीचा हंगाम सुरू होण्याच्या सुमारास रिगा हें बाल्टिक समुद्रावरील एक उत्कृष्ट बंदर म्हणून पुढें येईल. १९५० साल अखेर रशियांतील तांब्याचें उत्पादन युद्धपूर्व कालांतील उत्पादनापेक्षां दोन तृतियांशानें अधिक होईल. जॉर्जिआ या प्रजासत्ताक राज्यांत दरवर्षी ४ लाख ३० हजार टन लोखंड, ५ लाख टन पोलाद व ३ लाख ८० हजार टन रोल्ड मेटल तयार होईल इतके मोठे कारखाने उभारण्यांत येत आहेत. सोव्हिएट रशिआचा हा पंचवार्षिक कार्यक्रम पुरा झाला म्हणजे त्या देशांतील लोकांच्या रहाणीचें मान तर वाढेलच; पण औद्योगिक प्रगतीबरोबरच लष्करी सामर्थ्यांतहि वाढ होईल. सोव्हिएट रशिआंतील आर्थिक पुनर्घटनेबद्दल एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. रशिअन क्रांति होण्यापूर्वी रशिआंतील वांशिक दृष्टीनें भिन्न असलेल्या लोकसमूहांना वसाहतींतील लोकांप्रमाणें वागविलें जात असे. हिंदुस्थानांत १५० वर्षें राज्य करून सुद्धां ब्रिटिशांनीं ज्याप्रमाणें देश औद्योगिक दृष्ट्या मुद्दाम मागासलेला ठेवला त्याचप्रमाणें रशिअन सरकारनेंही झारच्या अंमलांत लहान राष्ट्रगटांना मागासलेलें ठेवलें होतें. पण आतां तो जमाना बदलून ' वसाहती ' म्हणून गणल्या गेलेल्या या छोट्या राष्ट्रांचीही आर्थिक उन्नति झपाट्यानें होत आहे.

**दोन लक्ष रुपयांची साडीः**—दारे सलाम ( टांगानिका ) येथें १० ऑगस्ट रोजीं ना. आगाखान ह्यांची हीरक तुला होणार आहे. त्या प्रसंगीं पेहेरण्यासाठी बेगम आगाखान ह्यांचेसाठी एक साडी हिंदुस्थानांत विणण्यांत येत आहे. त्या साडीची किंमत २,००,००० रुपये भरेल.

**घटना समितीः**—घटना समितीच्या निवडणुका जुलै अखेर संपविण्यांत येणार आहेत.



महाराष्ट्र एजंटः—मे. जयप्रकाश आणि कं., २५५।४ सदाशिव पेठ, पुणें

( गांवोगांवीं स्टॉकिस्ट नेमणें आहेत. )

## ॲटम बाँबचा आणखी एक प्रयोग

पॅसिफिक महासागरांतील बिकिनी द्वीपसमूहाच्या आसपास आरमाराचा एक काफिला उभा करून चौथ्या ॲटम बाँबचा प्रयोग नुकताच करण्यांत आला. या पूर्वी न्यू मेक्सिकोच्या ओसाड वाळवंटांत पहिला, हीरोशिमा व नागासिकी या जपानी शहरांवर अनुक्रमें दुसरा व तिसरा ॲटम बाँब टाकण्यांत आला होता. न्यू मेक्सिकोमध्यें झालेल्या प्रथम प्रयोगानंतर व प्रयोगाच्या वेळीं अत्यंत गुप्तता राखण्यांत आली होती. जपानी शहरावर हा विध्वंसक प्रयोग झाल्यावर ॲटम बाँबच्या संहारक शक्तीचीं भीतिप्रद वर्णनें येऊं लागलीं. पण आतां नव्यानें करण्यांत आलेल्या प्रयोगानंतर, हा बाँब इतका महाभयंकर नाहीं, असा प्रचार करण्यांत येत आहे. या नवीन अस्त्राच्या संहारक शक्तीविषयीं एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे. जपानी शहरावरील ॲटम बाँबला आपला प्रभाव दाखविण्यास शहरांतील प्रचंड इमारती होत्या. उलट, बिकिनी बेटावरील ॲटम बाँब आकाशाच्या पोकळींत टाकण्यांत आला. त्यामुळें बाँबचा खरा हिसका कळण्यास अनुकूल परिस्थिति नव्हती. अशा भिन्न परिस्थितींत ॲटम बाँबची भयानक शक्ति शंकराच्या तृतीय नेत्राप्रमाणें वाटेंत येईल त्याला भस्म करणारी नाहीं हें म्हणणें फक्त प्रचारकांना शोभण्यासारखें आहे. खुद्द अमेरिकन सरकारनें व अमेरिकन युद्धखात्यानें जपानवरील ॲटम बाँबच्या विध्वंसक प्रतापाचें वर्णन करणारे अहवाल प्रसिद्ध केले आहेत. युद्धखात्यातर्फे प्रसिद्ध झालेल्या अहवालांत असें नमूद केलें आहे कीं, हिरोशिमा शहरांतील ९० हजार इमारतींपैकीं ६० हजार इमारती जमीनदोस्त झाल्या. एका ॲटम बाँबची स्फोटक शक्ति २० हजार टी. एन्. टी. या स्फोटक द्रव्याबरोबर आहे हा हिशोब बरोबर ठरला असेंहि या अहवालांत म्हटलें आहे. बिकिनी बेटावरील ॲटम बाँबच्या प्रहारानें आसपास उभ्या असलेल्या आरमारी जहाजांपैकीं सुमारें निम्मीं नाश पावलीं असें समजतें. ॲटम बाँब वाटला तितका भयंकर नाहीं या प्रचाराबरोबरच आधुनिक युद्धाचें इतर साहित्य निरुपयोगी झालेलें नाहीं असेंहि सांगण्यांत येऊं लागलें आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. जपानी शहरावर ॲटम बाँब टाकला त्यानंतर लष्करी शास्त्रांत क्रांति झाली असा डांगोरा पिटण्यांत आला होता. या परस्पर विरोधी प्रचारावरून एकच अनुमान निघूं शकतें. तें असें कीं, अमेरिकन कारखानदारांच्या वाढलेल्या उत्पादन शक्तीला मोठ्या लष्कराची व आरमाराची मागणी असल्याशिवाय ते चालू शकणार नाहीं. तज्ज्ञांचा अंदाज असा आहे कीं, अमेरिकन कारखान्यांची उत्पादन-शक्ति युद्धपूर्वीपेक्षां तिप्पट झाली आहे. या प्रचंड उत्पादन-शक्तीला शांततेच्या उपयुक्त व्यवसायांत गुंतविण्यांत अमेरिकन सरकारला यश येतें कीं नाहीं हाच खरा महत्त्वाचा प्रश्न आहे.

### ब्रिटिश मोटारींची आयात


दरमहा १०, हा गतीनें ब्रिटिश मोटारी कराची बंदरांत उतरूं लागल्या आहेत. आतांपर्यंत फक्त एक अमेरिकन मोटार कराचींत आली आहे.

### लंडन-मॉस्को टेलिफोनला बंदी

लंडन-मॉस्को टेलिफोनचा फक्त सरकारी कामासाठीच उपयोग करतां येतो. नागरिकांना त्याचा उपयोग करतां येत असे; २८ जूनपासून त्यास बंदी करण्यांत आली आहे.

**बाजरी-ज्वारी मिळण्याची विनंति**—मधुमेह झालेल्या कित्येकांनीं आपणांस गव्हाऐवजीं बाजरी किंवा ज्वारी देण्यांत यावी, अशी सरकारास विनंति केली होती. मुंबई शहर व उपनगरें यांत रेशनमध्यें सध्या बाजरी किंवा ज्वारी मिळत नाहीं. सरकारनें हा प्रश्न न्युट्रिशन कमिटीकडे तिच्या मतासाठीं सोपविला. मधुमेह झालेल्यांनीं बाजरी किंवा ज्वारीच खाल्ली पाहिजे असें नाहीं, असें तज्ज्ञांचें मत पडलें. त्यामुळें, वरील विनंति सरकारनें मान्य केली नाहीं.


बिनचूकच्या माहितीनें
स्त्रियांचें तारुण्य आणि लावण्य कायम टिकतें.
किं. रु. ३-९ व रु. ५-९. मा. पुस्तक आणे ४.
१२ आणे अगाऊ आल्यास औषध व्ही. पी. नें पाठवूं.
—धी बॉम्बे जनरल एजन्सी—
भायखळा पुल, मुंबई नं. २७.
पूना स्टॉकिस्ट: सिताराम एजन्सी, ६९३ बुधवार पेठ, पुणें.
—— :इतर सर्वत्र स्टॉकिस्ट पाहिजेत: ——

पेडणेकर आणि कंपनी लि.,

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८



मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

महाराष्ट्र शारदेचीं तेजस्वी ग्रंथरत्नें वाचून
पैसा व ज्ञान मिळवा !
श्रीमंत कसें व्हावें—संपत्तीचा सुंदर मार्गदर्शक। हजारों रुपये मिळवून देतो. वाचून लक्षाधीश व्हा! किं. १॥ रु.
१०० टक्के यश—हें भाग्यवर्धक पुस्तक तुम्हांला व्यवहार, व्यापार व उद्योगधंदे यांत बिनचूक यश कसें मिळवावें तें शिकवील आणि कर्तबगार बनवील! किं. १॥ रु.
काम आणि कामिनी—तरुण स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक कामसौख्याचें सुंदर मार्गदर्शन करतें व स्त्रीस्वभावाची खरी कल्पना देतें! अत्यंत लोकप्रिय. किं. १॥ रु.
मृत्युलोकचा प्रवास—मरणोत्तर आत्म्याच्या अद्भुत हालचालींच्या सुरम्य कथा. वाचून थक्क व्हाल! किं. १ रु.—चारी पुस्तकें एकत्र घेतल्यास पोस्टेज माफ!
मेसर्स—विपट आणि मंडळी,
पो० कराड, जि. सातारा.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास, ८२३, शिवाजी नगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.